ePaper
# भाजपाचा बालेकिल्ला भोसरीत आज खासदार अमोल कोल्हेंचा दौरा

वर्ष - 7 । अंक - 309 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- राजस्थानचा सलग दुसरा विजय
- सोनाक्षीचा अप्रतिम लुक
- अरविंद केजरीवाल यांना दिलासा
- तर पुढची पिढी माफ करणार नाही


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 29 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## श्रीरंग बारणे विरुद्ध संजोग वाघेरे लढत


# दोन भूमिपुत्रांमध्ये 'टफ फाईट'

### लोकसभा निवडणूक रणसंग्राम : महायुतीकडून बारणे यांच्याहाती पुन्हा 'धनुष्यबाण'

। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी

**मावळ लोकसभा मतदार संघामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या 'धनुष्यबाण' चिन्हावर विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांची भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या 'मशाल' चिन्हावर माजी महापौर संजोग वाघेरे मैदानात आहेत. त्यामुळे या मतदार संघात पुन्हा एकदा दोन भूमिपुत्र आमने-सामने आले आहेत.**





शिवसेना मध्यवर्ती कार्यालय
कार्यालय : आनंदआश्रम, श्री भवानी चौक, टेंभी नाका, ठाणे (प.) - १.
दुरध्वनी : २५३४६६५५ फॅक्स : २५३३ ६३७९

प्रसिध्दी साठी -

हिंदूहृदयसम्राट वंदनीय **शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे** यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते **श्री एकनाथ शिंदे** यांच्या आदेशानुसार लोकसभा निवडणूक २०२४ साठी शिवसेना पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची पहिली यादी खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे -

| | मतदार संघ | उमेदवार |
|---|---|---|
| १ | ३० - मुंबई दक्षिण मध्य | श्री राहुल शेवाळे |
| २ | ४७ - कोल्हापुर | श्री संजय मंडलीक |
| ३ | ३८ - शिर्डी (अजा) | श्री सदाशिव लोखंडे |
| ४ | ५ - बुलढाणा | श्री प्रतापराव जाधव |
| ५ | १५ - हिंगोली | श्री हेमंत पाटील |
| ६ | ३३ - मावळ | श्री श्रीरंग बारणे |
| ७ | ९ -रामटेक (अजा) | श्री राजू पारवे |
| ८ | ४८ -हातकणंगले | श्री धैर्यशिल माने |

मावळ लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या लढतीचं चित्र आता स्पष्ट झाले आहे. शिवसेना शिंदे गटाने आज श्रीरंग बारणे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. तर दोन दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून संजोग वाघेरे पाटील यांना संधी दिली आहे. त्यामुळे मावळ लोकसभेत महायुतीचे श्रीरंग बारणे विरुद्ध महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे पाटील यांच्यात थेट सामना होणार आहे. हा सामना खऱ्या अर्थाने पिंपरी-चिंचवडच्या दोन भूमिपुत्रांमध्ये 'टफ फाईट' असा होणार आहे.

२०१९ मध्ये बारणे यांच्या विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून पार्थ पवार यांनी निवडणूक लढवली होती. त्यावेळी 'भूमिपूत्र विरुद्ध राजपूत्र' असा प्रचार बारणे यांनी केला होता. पिंपरी आणि चिंचवड या दोन्ही विधानसभा मतदार संघांमध्ये पार्थ पवार 'बॅकफुट'वर राहिले होते. आताची निवडणूक दोन्ही भूमिपुत्रांमध्ये होणार असल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये निवडणुकीची धुरळा पहायला मिळणार आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाची निर्मिती दि. १२ जुलै २००२ रोजी झाली. त्यानंतर २००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे दिवंगत गजानन बाबर विरुद्ध राष्ट्रवादीचे आझम पानसरे अशी लढत झाली होती. त्या निवडणुकीला धार्मिक किनार देण्यात आली. बाबर विजयी झाले होते.

त्यानंतर २०१४ च्या निवडणुकीत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप विरुद्ध श्रीरंग बारणे अशी लढत झाली. जगताप यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. शेकाप पक्षाने त्यांना पाठिंबा दिला. या निवडणुकीत जगताप पराभूत झाले.

२०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे पार्थ पवार विरुद्ध श्रीरंग बारणे असा सामना रंगला. या निवडणुकीत भूमिपुत्र विरुद्ध राजपुत्र असा प्रचार झाला. पार्थ पवार पराभूत झाले. बारणे यांच्या विजयात पिंपरी-चिंचवडकरांचा मोठा वाटा राहिला.

आता २०२४ ची निवडणूकसुद्धा अटीतटीची होणार असून, दोन भूमिपुत्र आमने-सामने आले आहेत. संजोग वाघेरे आणि श्रीरंग बारणे या दोघांना मानणारा मोठा मतदारवर्ग पिंपरी-चिंचवडमध्ये आहे. त्यांच्या जोडीला महाविकास आघाडी आणि महायुतीची ताकद आहे.त्यामुळे ही निवडणूक प्रचंड रंगतदार होणार असून, वाघेरे की पुन्हा बारणे याची उत्सुकता पिंपरी-चिंचवडकरांना आहे.

### उमेदवारीबाबत 'महाईन्यूज' चा अंदाज ठरला खरा...

मावळमधील उमेदवारीबाबत पिंपरी-चिंचवडसह, पुणे जिल्ह्यातील प्रसारमाध्यमांमध्ये वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात होते. विशेष म्हणजे, बारणे यांचा पत्ता कट होईल आणि या ठिकाणी राष्ट्रवादी अथवा भाजपाचा उमेदवार दिला जाईल, असा दावा केला जात होता. परंतु, 'महाईन्यूज' ने दि. २८ मार्च च्या अंकात "मावळमध्ये दोन्ही शिवसेना आमने-सामने" या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. हा अंदाज खरा ठरला आणि दुपारी बारणे यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा झाली.



खासदार श्रीरंग बारणे धनुष्यबाणावर लढण्याची शक्यता

मावळमध्ये दोन्ही शिवसेना आमने-सामने?

मंचरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सुतोवाच

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी

मावळ लोकसभा मतदारसंघातुन धनुष्यबाणाच्या चिन्हावर खासदार श्रीरंग बारणे लढतील हे जवळपास स्पष्ट झाले आहे. मंचरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच त्याबाबत सुतोवाच दिले आहे. मावळ मध्ये धनुष्यबाणाचा प्रचार करा, असे आवाहन त्यांनी केले होते. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून संजोग वाघेरे यांनी मशाल हाती घेतली आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आता खासदार श्रीरंग बारणे हे मैदानात असणार आहेत. दोन्ही शिवसेना आमने सामने असल्याने या मतदारसंघातील लढत रंगतदार ठरणार आहे. मावळचे शिवसैनिक कोणाच्या बाजूने असणार, हे

(दि. २६) झालेल्या मंचर येथील सभेत स्पष्ट केले आहे. पवार यांनी कार्यकर्त्यांना

वाघेरे विरुद्ध बारणे यांच्यात राजकीय आखाडा पाहायला मिळणार आहे. गेल्या दोन

तर खासदार बारणे यांच्यासाठी निवडणूक सोपी ठरणार ?




### सुनील शेळके यांचा विरोध मावळला...

मावळचे आमदार सुनील शेळके यांनी खासदार बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची समजूत काढल्याचे वृत्त आहे. महायुती म्हणून आम्ही प्रचार करु अशी भूमिका शेळके यांनी घेतली आहे. त्यामुळे श्रीरंग बारणे यांना फायदा होणार आहे. दुसरीकडे, संजोग वाघेरे यांनी मावळ, कर्जत, पनवेल आणि उरण मतदार संघामध्ये दौरे वाढवले आहेत. या तीन मतदार संघात शेकापची ताकद चांगली आहे. शेकापचा महाविकास आघाडीला पाठींबा असल्याने वाघेरे यांचेही परडे जड आहे. त्यामुळे मशाल की धनुष्यबाण... कोण मारणार बाजी..? अशी चर्चा सुरू झाली आहे.

## जागा वाटपात विश्वासात घेतलं नाही

# महायुतीत 'आरपीआय' नाराज

### लोकसभा निवडणूक रणसंग्राम : रामदास आठवले म्हणतात... तर आम्ही वेगळा विचार करू!

।पुणे महाईन्यूज।

**महायुतीच्या जागावाटपात रिपब्लिकन पक्षाकडे दुर्लक्ष केलं जात आहे. युतीत आम्हाला विश्वासात घेतलं जात नाही. लोकसभेच्या दोन जागा आम्ही मागितल्या आहेत, मात्र साधे चर्चेलाही बोलाविले जात नाही. त्यामुळे महायुतीमध्ये आम्ही नाराज आहोत. पुढील दोन-तीन दिवसांत पुढील भूमिका घेण्यात येईल असा इशारा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिला.**

रिपाइं (आठवले गट) पक्षाची राज्य कार्यकारिणीची बैठक पुण्यात गुरुवारी झाली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. रामदास आठवले म्हणाले, आम्हाला लोकसभेच्या दोन जागा पाहिजेत. शिर्डी लोकसभेची जागा मिळाली तर मी उत्सुक आहे. सोलापूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. त्याठिकाणी आमचा उमेदवार तयार होता. मात्र, भाजपने उमेदवार जाहीर केला. मला महाविकास आघाडीची ऑफर होती, पण मी नाकारली. सध्याची महायुती आरपीआयच्या पाठिंब्यामुळे झाली असून रिपब्लिकन पक्षाकडे लक्ष दिलं जात नसल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.



केंद्रात आणि राज्यात एक मंत्रीपद मिळेल असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं होतं. मात्र त्यांनी हे आश्वासन पूर्ण केलं नाही. महायुतीमध्ये असूनही आम्हाला राज्यात मंत्रिपद देण्यात आलेले नाही.आम्हाला सन्मान मिळावा ही अपेक्षा आहे. राज्य सरकारच्या शासकीय कार्यक्रमात माझा फोटो कुठेही लावला जात नाही. आमची मते मिळवायची असतील तर फोटो छापला जातो. फोटो नसल्यामुळे कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### ... तर आम्ही भाजपाची 'ए- टीम'

महाविकास आघाडीमधून प्रकाश आंबेडकर यांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भाजपची 'बी' टीम म्हणून त्यांच्यावर टीका होत आहे. त्या प्रश्नावर रामदास आठवले म्हणाले की, प्रकाश आंबेडकर जर 'बी' टीम असेल तर भाजपसोबत माझी 'ए' टीम आहे. 'बी' टीम वैगरे चर्चा होते. मतांची जर विभागणी होत असेल तर त्याची चर्चा होते. त्यामुळे प्रकाश आंबेडकर भाजपची 'बी' टीम अजिबात नाही. तर प्रकाश आंबेडकर हे वंचित आघाडीचे नेते असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# काँग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकरांचे वाढलं 'टेन्शन'

### लोकसभा निवडणूक रणसंग्राम : पुण्यात ठाकरे गट काम करणार नाही?

।पुणे महाईन्यूज।

**पुणे लोकसभा मतदार संघात महायूतीकडून मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकर यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी वैयक्तिक भेटीगाठी, मेळावे घेत प्रचाराला सुरुवात केली आहे.**

दरम्यान, भाजपकडून नाराज असलेले सर्वजण सक्रिय झाल्याचे चित्र असताना महाविकास आघाडीमध्ये सुंदोपसुंदी पहायला मिळत आहे. लोकसभा निवडणूक नियोजनासंदर्भात महाविकास आघाडीच्या बैठकीत शिवसेना ठाकरे गटाची नाराजी स्पष्ट दिसून आली. अगोदर विधानसभा निवडणुकीच्या वेळी कसबा शिवसेनेच्या ठाकरे गटाला सोडला जाईल हे आधी जाहीर करा, तरच लोकसभेसाठी काम करू असा पवित्रा ठाकरे गटाने घेतल्याने धंगेकरांचे टेन्शन वाढले आहे.

भाजपचे मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपमधून इच्छुक असलेले भाजपचे माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक, माजी खासदार संजय काकडे हे त्यांची नाराजी सोडून सक्रिय झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस(अजित पवार गट) शिवसेना(शिंदे गट) हेही मोहोळ यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र आहे.

महाविकास आघाडीच्या शहर पातळीवरच्या नेत्यांची बैठक नुकतीच कॉंग्रेसभवन येथे पार पडली. बैठक सुरू असतानाच शिवसेना ठाकरे गटाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. कसबा विधानसभामध्ये यापूर्वी आम्ही भाजपची तळी उचलली, आता कॉंग्रेसची उचलत आहोत. प्रचारात सहभागी होऊ पण



विधानसभा निवडणुकीमध्ये कसबा शिवसेना ठाकरे गटाला सोडणार असा शब्द द्या असा इशारा देतानाच आम्ही आयुष्यभर दुसऱ्यांच्याच तळ्या उचलायच्या का? असा प्रश्न उपस्थित केला. त्याचीच री ओढत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाकडूनही विधानसभेसाठी कसब्यावर दावा करण्यात आला आहे.

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघामध्ये ठाकरे गटाचा जो मूळ शिवसैनिक आहे, तो मतदार मोठ्या प्रमाणात आहे. शिवसेनेकडून यापूर्वी विशाल धनवडे यांनी कसबा पेठ विधानसभा निवडणुकीत आपले नशीब आजमावलेले आहे. विशाल धनवडे यांच्यासोबतच ठाकरे गटातील काही नेते हे गेल्या वर्षी झालेल्या पोटनिवडणुकीत देखील निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक होते. मात्र त्यावेळेस महाविकास आघाडीने एकत्रित निर्णय घेऊन ही जागा कॉंग्रेसच्या रवींद्र धंगेकर यांना दिली होती. आता रवींद्र धंगेकर हे लोकसभेचे उमेदवार असल्या कारणे कसब्याची जागा आम्हाला सोडावी, असा आग्रह ठाकरे गटाने केला आहे. इतकंच नाही तर आधी ही जागा आम्हाला सोडण्याचा शब्द द्या, त्यानंतरच धंगेकर यांचं काम सुरू करू, असा थेट इशाराच ठाकरे गटाने दिला आहे. ठाकरे गटाच्या या पवित्र्यामुळे रवींद्र धंगेकर यांचं टेन्शन वाढलं आहे.

### धंगेकरांच्या अडचणीत वाढ...

धंगेकरांच्या उमेदवारीला पक्षांतर्गत विरोध पहायला मिळत आहे. कॉंग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागूल यांनी उघडपणे नाराजी व्यक्त करत कॉंग्रेस भवनमध्ये मुक निदर्शने केली. ते या बैठकीला उपस्थित नव्हते. एकीकडे पक्षांतर्गत विरोध आणि आता महाविकास आघाडीतील घटक पक्षांची नाराजी यामुळे धंगेकरांचे टेन्शन वाढले आहे.

### महाविकास आघाडीचा एकत्रित विजय

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर गेल्या वर्षी लागलेल्या पोटनिवडणुकीमध्ये कॉंग्रेसचे रवींद्र धंगेकर विजयी झाले होते. भाजपचा गड असणारा कसबा पेठ विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीने आपल्या एकीच्या बळावर सर केला होता. या पोटनिवडणुकीमध्ये कॉंग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या तिन्ही पक्षांनी एकत्रित जोर लावून काम केल्यामुळे रवींद्र धंगेकर यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला होता. आणि त्यावेळेसच महाविकास आघाडीचा हा कसबा पॅटर्न राज्यभर गाजला होता. मात्र या निवडणुकीच्या एक वर्षानंतरच लागलेल्या लोकसभा निवडणुकीत समोर आलेला आता नवा कसबा पॅटर्न हा महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरत आहे.

## शिरुर, मावळमध्ये महायुतीला दिलासा

# निवडणुकीतील बंडोबा झाले थंड!

### लोकसभा निवडणूक : उमेदवारीचा तिढा सुटल्यानंतर प्रचारासाठी सकारात्मक भूमिका

।पिंपरी महाईन्यूज।

**शिरूर आणि मावळ मधील महायुतीचे उमेदवार ठरले आहेत. माझे खासदार शिवाजीराव पाटील आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होताच दोन्ही मतदारसंघातील बंडोबा थंड झाले आहेत. महायुतीचा धर्म पाळत वरिष्ठांच्या सूचनेनुसार प्रचार करू अशी मवाळ भूमिका बंड करणाऱ्यांनी घेतली आहे. महायुतीचा धर्म मनापासून पाळल्यास दोन्ही मतदारसंघात त्याचा फायदा होईल अन्यथा महाविकास आघाडीच्या ते पथ्यावर पडेल अशी चर्चा आहे.**

शिरूर लोकसभा मतदारसंघात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत दाखल झाले. त्यांच्या पक्ष प्रवेशापूर्वी त्यांना अजित दादांच्या राष्ट्रवादीतून विरोध होता. खेड आळंदी चे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी महायुतीचा धर्म पाळणार नसल्याची सांगत आढळराव यांना चॅलेंज केले. तर भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी स्वतःच्या उमेदवारीची घोषणा करत आपण या स्पर्धेत असल्याचे दाखविले. त्यामुळे त्यांच्याकडूनही आयात उमेदवारांवर नाराजी दर्शवत काम करणार नसल्याचे सूतोवाच दिले होते. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार



यांनी आढळराव यांच्या नावावरच शिक्कामोर्तब केले. त्यामुळे आमदार दिलीप मोहिते माजी आमदार विलास लांडे यांना आपली विरोधाची तलवार अखेर म्यान करावी लागली असल्याचे चित्र आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे राहिले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक आमदार सुनील शेळके, अण्णा बनसोडे ज्यांनी राष्ट्रवादीला मतदारसंघ सोडावा असे म्हणत खासदार श्रीरंग बारणे यांच्या कामाचा लेखाजोखाच मागितला. तर भाजपामध्ये देखील हीच अस्वस्थता दिसली. बारणे भाजपातून लढतील, अशी शक्यता निर्माण होताच भाजपाचे माजी मंत्री बाळा भेगडे यांनी त्याला विरोध केला. त्यांनीही स्वतः इच्छुक असल्याचे सांगितले.

#### महायुती मधील वाद टळला...

खासदार श्रीरंग बारणे यांना भाजपा मधून उमेदवारी मिळेल अशी शक्यता होती. मात्र भाजपामधून त्यांना मोठा विरोध झाला. पदाधिकाऱ्यांनी काम करणार नसल्याची भूमिका घेतली. तसेच भाजपाच्या अंतर्गत सर्वे मध्ये खासदार बारणे निगेटिव्ह असल्याची चर्चा रंगली होती. बारणे भाजपाच्या कमळावर लढले असते तर महायुतीमध्ये युतीचा धर्म पाळला गेला नसता अशी चर्चा आहे. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धनुष्यबाणावरच महायुतीने लढविण्यात आले आहे.

महायुती मधील या बंडखोरीमुळे त्याचा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यामुळे ही बंडखोरी रोखण्यासाठी वरिष्ठांनी पुढाकार घेतला. वाद टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर विशेष खबरदारी घेतल्याची दिसले. पदाधिकाऱ्यांमधील मनभेद दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दिलीप मोहिते पाटील विलास लांडे बाळा भेगडे सुनील शेळके यांनी माहितीचा धर्म पाळून काम केले जाईल अशी वरवर तरी भूमिका घेतल्याची दिसते. काय होईल हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट होईल.

---

## मिळकतकर वसुलीसाठी प्रशासनाचा 'ओव्हरटाईम'

### सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही रात्री 9 पर्यंत संकलन कार्यालये सुरु ठेवणार

।पिंपरी महाईन्यूज।

**कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने कर वसुलीचे 1 हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. उद्या (शुक्रवार) पासून महापालिकेला तीन दिवस सुट्टी आहे. मात्र, या तिन्ही दिवसात सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत नागरिकांना कर भरता यावा, यासाठी कॅश काउंटर सुरू ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापालिकेने घेतला आहे. तसेच सध्या महापालिका तिजोरीत 910 कोटींचा महसूल जमा झाला असताना शेवटच्या तीन दिवसात 90 कोटी वसूल करण्याचे आव्हान कर संकलन विभागापुढे असणार आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी 17 विभागीय कार्यालये आणि ऑनलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत 910 कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. 1 हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कठोर कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळेच सातत्याने कराचा भरणा वाढला आहे.

नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे. उद्या शुक्रवारी गुड फ्रायडे आणि शनिवार, रविवार महापालिकेला शासकीय सुट्टी आहे.

मात्र, या तिन्ही दिवशी नागरिकांच्या सोयीसाठी कर संकलन कार्यालये सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत कॅश काउंटरवर मालमत्ता कराचा भरणा स्विकारला जाणार आहे, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

सहायक आयुक्त नीलेश देशमुख म्हणाले की, शहरातील निवासी मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. मात्र, ज्या थकबाकीदारांची आर्थिक क्षमता नाही, त्यांनी टप्या-टप्याने जेवढा शक्य आहे तेवढा कर भरावा. जेणेकरून विलंब शुल्काची रक्कम दिवसेंदिवस वाढणारी कमी होईल. कर थकीत ठेवणे हे नागरिकांच्या दृष्टीने आर्थिक हिताचे नाही. थकीत कर भरणे हे नागरिकांच्याच फायद्याचे आहे.



**गेल्या अनेक वर्षातील आत्तापर्यंत सर्वाधिक म्हणजे तब्बल 76 कोटींची पाणीपट्टीची वसुली झाली आहे. मात्र, त्यानंतरही पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात थकीत आहे. तसेच आगामी आर्थिक वर्षातही मिळकत कर आणि पाणीपट्टी थकीत असणा-यांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येणार आहे. त्यामुळे ही निरंतर कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी 31 मार्चपूर्वी पाणीपट्टी, मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.**

**– प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

#### वाकड झोनमध्ये सर्वाधिक संख्या..

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे 17 झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे 65 हजार मालमत्ता धारकांनी 148 कोटी रुपयांचा कर जमा केला आहे. त्याखालोखाल सांगवी, चिखली, चिंचवड, मोशी, भोसरी झोनमध्ये कराचा भरणा झाला आहे. तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये फक्त 8 हजार 96 मालमत्ता धारकांनी 23 कोटी 38 लाखांचा कर भरणा केला आहे.



# भूमिका

**आर्थिक प्रगतीत मागे पडलेल्या आशियाई आणि आफ्रिकी देशांत प्रचंड प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करून या देशांना आपले मिंधे बनवण्याची चीनची राक्षसी महत्वाकांक्षा अजिबात लपून राहिलेली नाही. चीनच्या 'बेल्ट अँण्ड रोड प्रोजेक्ट'चा भाग म्हणून पाकिस्तानात 'चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' या नावाखाली चाललेला पायाभूत सेवांचा विकास, हा त्याच महत्त्वाकांक्षेचा एक नमुना.**

# चिनी प्रकल्पांवर वारंवार हल्ले का ?

सिंधू नदीवरल्या दासू धरणाच्या बांधकाम स्थळाकडे जाण्यासाठी हे कामगार व अभियंते ज्या मोटारीने इस्लामाबादहून निघाले होते, ती मोटारच बॉम्बस्फोटाने उडवून देण्यात आली आणि स्वत:चा काहीही दोष नसलेले पाचही चिनी कामगार भर दुपारी किडामुंगीसारखे मरून पडले. याआधी गेल्या बुधवारी, २० मार्च रोजी ग्वादर बंदरापासून सात कि.मी.वरल्या चिनी मालगोदामाच्या प्रवेशदारावर स्फोटकांनी भरलेली मोटार धडकवण्यात आली, त्यात पाच सुरक्षा रक्षक आणि आठही हल्लेखोर यांचा मृत्यू होऊनसुद्धा, चिनी आणि पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी मात्र 'स्फोटकांचा पूर्ण भडका रोखण्यात तात्काळ यश मिळवण्यात आले' अशा बातम्या दिल्या होत्या!पााकिस्तानी प्रसारमाध्यमांनी दुसऱ्या हल्ल्याबद्दलही अशीच अर्धवट माहिती दिली आहे. याचे ठिकाण



होते 'पीएन्एस सिद्दीक' हा पाकिस्तानी नौदलाचा तुरबत या शहरानजीकचा हवाई तळ. या तळावर २५ मेच्या सोमवारी रात्री कथित अतिरेक्यांनी बंदुकांच्या फैरी झाडल्या, स्फोटही घडवले. त्यात सहा अतिरेकी ठार झाल्याचे पाकिस्तानी नौदलातील माहीतगार सांगतात, पण 'या तळावरील हल्ला अयशस्वी ठरवण्यात आम्ही यश मिळवले' एवढेच पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या 'पीएन्एस सिद्दीक' तळावर चिनी ड्रोन तैनात असून त्यांचा नित्य वापर टेहळणीसाठी केला जातो, हे लष्करी जाणकारांना आधीपासूनच माहीत आहे. हल्ल्यात नौदलाच्या मालमत्तांचे काही नुकसान झाले का, असल्यास किती, याची माहिती मात्र कोणीही देत नाही.याउलट, 'अशा हल्ल्यांमुळे चीन-पाकिस्तानच्या संबंधांत अजिबात बाधा येणार नाही' हे पालुपद मात्र चिनी आणि पाकिस्तानी उच्चपदस्थांकडून आठ दिवसांत तीनदा आळवले गेले. प्रत्येक हल्ल्यानंतरचा हा जणू राजशिष्टाचारच ठरतो आहे, कारण याच खैबर-पख़्तूनख्वा भागात २०२१ साली स्फोटाने बसगाडी उडवून देणारा हल्ला घडला, त्यातील १३ मृतांपैकी नऊ चिनी कामगार होते, तेव्हाही मैत्रीच्या आणाभाका घेण्यापलीकडे कोणतेही विधान ना पाकिस्तान्यांनी केले होते, ना चिन्यांनी! या हल्ल्यामागे जर बलोच स्वातंत्र्यवादी गट असतील तर केवळ बंदुकीने त्यांचा बंदोबस्त होणार का, हा प्रश्न – आणि अर्थातच 'होणार नाही' हे त्याचे उत्तर- पाकिस्तानी लष्कर आणि तेथील सरकारचे उच्चपदस्थ वर्षानुवर्षे टाळत आलेले आहेत. अशा स्थितीत चीनने तरी आपल्या पंखाखालच्या पाकिस्तानला, 'वाटाघाटींनी बलुचिस्तानचा प्रश्न सोडवा' यासारखे सल्ले द्यायला नकोत? पण तसे होत नाही. खुद्द चीनच लोकशाहीवादी नाही, हे वाटाघाटींचा पर्याय न सुचण्या/सुचवण्यामागचे एक कारण असू शकते: पण ते काही प्रमुख कारण नव्हे. बलोच राष्ट्रवादी गटांचे संबंध पाकिस्तानी तालिबानांशी (तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' या संघटनेशी) असल्याचा निराधार आरोप पाकिस्तानकडून गेल्या काही वर्षांत सूचकपणे केला जाऊ लागला आहे; परंतु या पाकिस्तानी तालिबानांचे चीनमधील विगुर अतिरेक्यांच्या 'ईस्ट तुर्किस्तान इस्लामिक मूव्हमेंट'शी संबंध असल्याचे उघड आहे. बलोच राष्ट्रवादी चळवळ दडपून टाकणे हे पाकिस्तानचे उद्दिष्ट आहे आणि त्यात आजवर सातत्याने केवळ अपयश आल्यामुळे, तालिबान्यांना एकेकाळी पोसणाऱ्या पाकिस्तानला आता बलोच अतिरेक्यांच्या बंदोबस्तासाठी चीनच्याच तोंडाकडे पाहावे लागणार, हे उघड आहे. शिवाय पत्रकाचा शेवट 'पाकिस्तानला चीन नेहमीच साथ देईल आणि पाकिस्तानमधील चिनी कर्मचारी, प्रकल्प आणि संस्था यांच्या सुरक्षेसाठी आणि सुरक्षिततेसाठी शक्य ते सर्व काही करण्यासाठी दृढ वचनबद्ध राहील' अशा शब्दांतला असल्यामुळे आता पाकिस्तानी लष्कर आणि त्यांचे अंकित सरकार हे ज्यांना 'दहशतवादी' ठरवेल.

## संपादकीय »

# 3 पिढ्यांचा तमाशा!


***देशभर नावलौकिक मिळवणाऱ्या कल्याणी कुटुंबातील मतभेद एका वेदनादायी प्रश्नास जन्म देतात, तो म्हणजे मराठी उद्योगांचे हे असे का होते?***

आज अनेकांस ठाऊकही नसेल पण एकेकाळी या राज्यातील लक्ष्मणराव बळवंत फाटक नामे निवृत्त रेल्वे कारकुनास सरकारी कंत्राटांसाठी एक कंपनी काढावीशी वाटली आणि एका जैन परिचिताच्या साहाय्याने त्याने ती खरोखरच काढली. मुंबई-पुणे बोरघाटातील बोगद्यासह अनेक ऐतिहासिक रेल्वे कामे या फाटकांच्या कंपनीने केली. पण दोघांचे बिनसल्यानंतर ही कंपनी टाटा समूहात विलीन झाली. या फाटक यांच्या सहकारी भागीदाराचे नाव वालचंद हिराचंद. फाटक यांस अशी काही कल्पना सुचायच्या आधी याच राज्यातील एका तरुणास मुंबईतील जेजे कला महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे वाटले. पण जन्मजात रंगांधळेपणाच्या दोषामुळे त्यास कला शाखा सोडावी लागली. तथापि आरेखनाचा ध्यास स्वस्थ बसू देईना. त्यातूनच त्याने आसपासच्या शेतकऱ्यांस कायमस्वरूपी वापरता येईल असा पोलादी नांगर बनवला.

देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. महाराष्ट्रातील निवडणूक एकूण पाच टप्प्यात होणार आहे. निवडणुकांच्या घोषणाबरोबरच विविध पक्ष आणि आघाड्या यांच्यात मतदारसंघांसाठी रस्सीखेच सुरू झाल्याचे दिसते. महाराष्ट्रात मुख्यत: दोन निवडणूक आघाड्या दिसतात.

# 'वंचित'ला सोबत न घेतल्याचे परिणाम

त्यापैकी एक शरद पवार -उद्धव ठाकरे प्रणीत महाविकास आघाडी असून दुसरी भाजपाप्रणीत महायुती. यात एक तिसरा महत्वाचा घटक आहे, तो म्हणजे सध्यातरी स्वत: निवडून न येता एकाला जिंकून देणारा तर दुसऱ्याला हरविणारी बहुजन वंचित आघाडी (बविआ). मागच्या निवडणुकाप्रमाणेच यावर्षीच्या निवडणुकामध्ये बविआ हाच महत्वाचा घटक ठरू शकतो. बहुजन वंचित आघाडीची ठाकरे -पवार आघाडीसोबत युती होऊ नये, यासाठी अदृश्य खेळ व वाटाघाटी सुरू असणे हे राजकारणात वेगळे नाही. तर दुसरीकडे महाविकास आघाडीसमोर वंचितला किती जागा द्यायच्या हा घोळ होता. त्यांना स्वत:चेच मतदारसंघ वाटप करण्यात अडचणी येत होत्या. महायुतीलाही त्याच प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे.महाराष्ट्रात झालेल्या मागील २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आकड्याकडे बघू या. कारण या आकड्यातूनच राज्यात कोणत्या पक्षाची किती ताकद आहे हे उघड होत असते. २०१४ व २०१९ च्या



निवडणूक आकड्यानुसार भाजपाला दोन्ही वर्षात २३ जागासह अनुक्रमे २७.६ आणि २७.८ टक्के मते मिळाली होती तर शिवसेनेला १८ जागासह अनुक्रमे २०.८ व २३.५ टक्के मिळाली. मागील दोन्ही लोकसभा निवडणुकामध्ये विरोधी पक्षांची नरेंद्र मोदींचे गुजरात मॉडेल (२०१४) आणि पुलवामा प्रकरण (२०१९) या दोन्ही घटनांमुळे दाणादाण उडाली. २०१४ च्या निवडणुकात कॉंग्रेस पक्षाला केवळ २ जागा तर २०१९ ला विदर्भातून केवळ एका जागेवर विजय प्राप्त होत अनुक्रमे १८.३ व १६.४ टक्के मतदान झाले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला दोन्ही निवडणुकांमध्ये ४ जागा मिळून अनुक्रमे १६.१ आणि १५.७ टक्के मते मिळाली होती. या आकडेवारीवरून दोन्ही पक्षांच्या मतांची टक्केवारी घसरली हे दिसून येते. कॉंग्रेस व राष्ट्रवादीच्या एकूण मतांची अनुक्रमे १.९ आणि ०.४ टक्क्यांनी घसरण झाली तर भाजपा व शिवसेना यांच्या मताच्या टक्केवारीत ०.२ व २.७ टक्यांनी वाढ झाली असली तरी २०१४ च्या तुलनेमध्ये २०१९ ला विजयी उमेदवारांच्या संख्येत वाढ झाली नव्हती.२०१४ च्या लोकसभा निवडणुकामध्ये बहुजन वंचित आघाडीची स्थापना झाली नसताना प्रकाश आंबेडकरांच्या भारिप बहुजन संघाला २३ जागा लढवून केवळ ०.७ टक्के मते मिळत एकूण ३,६०,८५४ मते प्राप्त झाली होती. परंतु बहुजन वंचित आघाडी स्थापन झाल्यानंतर २०१९ च्या लोकसभामध्ये मिळालेली ७ टक्के मते हा फार मोठा बदल होता. २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकामध्ये कॉंग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचा पराभव होण्यात वंचित बहुजन आघाडीचा (बविआ) मोठा वाटा होता. राज्यातील १४ मतदार संघामध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना ८० हजारावरून अधिक मते मिळालीत.

# ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तर पुढची पिढी माफ करणार नाही!

## आघाडीत सांगली आणि भिवंडी जागेवर तिढा कायम

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जागावाटप आणि आगामी निवडणुकीच्या एकत्रित प्रचारावर चर्चा झाली. या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी जितेंद्र आव्हाड यांना प्रश्न विचारण्यात आला की, आजच्या बैठकीत काय चर्चा झाली.**

प्रचार कसा करावा, कोणत्या विषयावर प्रचार करावा, प्रचारादरम्यान कोणत्या विषयांना हात घालावा, आपला प्रचार हा सकारात्मक असायला हवा, त्यात कुठेही नकारात्मकता नसावी अशा सगळ्या विषयांवर साधकबाधक चर्चा झाली.महाविकास आघाडीत सांगली आणि भिवंडी लोकसभेच्या जागेवर तिढा कायम असल्याचं सांगितलं जात आहे. यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, ज्या अर्थी आम्ही सर्व नेते उद्यापासून एकत्र प्रचार कसा करायचा यावर चर्चा करत आहोत याचा अर्थ सगळे तिढे सुटलेत याचे संकेत नाहीत का? आम्ही पुढच्या दीड-दोन महिन्यात प्रचार कसा करावा, प्रचाराचा विषय काय असावा, प्रचाराचे मुद्दे काय असावेत, आमच्या घोषणा काय असाव्यात यावर चर्चा झाली आहे. 'बस हुई महंगाई की मार, अब क्यों चाहीए मोदी सरकार?' अशी एक घोषणा तयार करण्यात आली आहे.यावेळी आव्हाड यांना प्रश्न विचारण्यात आला की, आजच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीबाबत काही चर्चा झाली का? त्यावर आव्हाड म्हणाले, आम्ही अजूनही प्रकाश आंबेडकरांना म्हणतोय की तुम्ही महाविकास आघाडीत या, तुमचं स्वागत आहे. आपण एकत्र बसून या सगळ्यावर तोडगा काढूया.





महाराष्ट्राच्या हितासाठी, देशाच्या हितासाठी, बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र येऊ. तसेच संविधानाविरोधात काम करणाऱ्यांना फायदा होईल असं काही केलं तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही.मविआचे नेते आणि ठाकरे गटातील खासदार संजय राऊत अजूनही महाविकास आघाडी मजबूत असल्याचा दावा करत असतानाच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी थेट संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत वंचित बहुजन आघाडीच्या पाठीत चाकू खुपसत आहेत असं चित्र दिसतंय. या फोटोसह प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. आंबेडकर यांनी म्हटलं आहे की, संजय राऊत, तुम्ही किती खोटं बोलणार? तुम्ही म्हणताय की तुमचे आणि आमचे विचार एकसारखे आहेत तर मग तुमच्या बैठकांमध्ये तुम्ही आम्हाला का बोलवत नाही? ६ मार्च रोजी फोर सीझन्स हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला आमंत्रित का केलं नाही? तुम्ही आजही वंचितला आमंत्रित न करता बैठक बोलावली आहे, आमच्याशिवाय बैठक का करताय? तुम्ही तर मित्राच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचं काम केलं आहे. सिल्व्हर ओकवर झालेल्या बैठकीत तुम्ही काय भूमिका घेतली होती ते आम्हाला माहिती आहे. अकोल्यात आमच्याविरोधात उमेदवार उभा करण्याबाबत तुम्ही मुद्दा उपस्थित केला होता हे खरं नाही का? एका बाजूला आघाडी बनवत असल्याचं चित्र निर्माण करताय आणि दुसऱ्या बाजूला आम्हालाच पाडण्याचा कट रचताय.

### एकत्र बसून तोडगा काढूया

» प्रचार कसा करावा, कोणत्या विषयावर प्रचार करावा, प्रचारादरम्यान कोणत्या विषयांना हात घालावा, आपला प्रचार हा सकारात्मक असायला हवा, त्यात कुठेही नकारात्मकता नसावी अशा सगळ्या विषयांवर साधकबाधक चर्चा झाली.महाविकास आघाडीत सांगली आणि भिवंडी लोकसभेच्या जागेवर तिढा कायम असल्याचं सांगितलं जात आहे. यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, ज्या अर्थी आम्ही सर्व नेते उद्यापासून एकत्र प्रचार कसा करायचा यावर चर्चा करत आहोत याचा अर्थ सगळे तिढे सुटलेत याचे संकेत नाहीत का? आम्ही पुढच्या दीड-दोन महिन्यात प्रचार कसा करावा, प्रचाराचा विषय काय असावा, प्रचाराचे मुद्दे काय असावेत, आमच्या घोषणा काय असाव्यात यावर चर्चा झाली आहे. 'बस हुई महंगाई की मार, अब क्यों चाहीए मोदी सरकार?' अशी एक घोषणा तयार करण्यात आली आहे.यावेळी आव्हाड यांना प्रश्न विचारण्यात आला की, आजच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीबाबत काही चर्चा झाली का? त्यावर आव्हाड म्हणाले, आम्ही अजूनही प्रकाश आंबेडकरांना म्हणतोय की तुम्ही महाविकास आघाडीत या, तुमचं स्वागत आहे. आपण एकत्र बसून या सगळ्यावर तोडगा काढूया.

# नाना पटोलेंनी पैसे घेऊन डॉ. पडोळेंना उमेदवारी दिली

## भाजपच्या उमेदवाराला जिंकवण्यासाठी भंडाऱ्यात 'डमी' उमेदवार

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भाजपच्या उमेदवाराला जिंकवण्यासाठी भंडाऱ्यात काँग्रेसचा 'डमी' उमेदवार देण्यात आला असून कोट्यवधी रुपये घेऊन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी दिली, असा गंभीर आरोप काँग्रेसचे माजी आमदार सेवक वाघाये यांनी केला आहे.**

वाघाये भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक होते. मात्र, उमेदवारी न मिळाल्याने ते नाराज झाले. यातूनच वाघाये आरोप करीत असल्याचे बोलले जात आहे.नाना पटोले यांच्यावर आरोप करताना सेवक वाघाये म्हणाले की, भंडारा-गोंदियाचे महायुतीचे उमेदवार भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे हे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे नातेवाईक आहेत. त्यांना जिंकवण्यासाठीच काँग्रेसने भंडाऱ्यात डमी उमेदवार दिला. लोकसभेत भाजप जिंकणार



आणि त्या बदल्यात साकोली विधानसभेचा नाना पटोले यांचा मार्ग मोकळा होईल. डॉ. प्रशांत पडोळे यांनी त्यांच्या वडिलांची जमीन विकून उमेदवारीसाठी नाना पटोले यांना ५ कोटी रुपये दिल्याच्या चर्चा आहे.सेवक वाघाये यांनी काँग्रेस पक्षाकडे लोकसभेसाठी उमेदवारी मागितली होती. मात्र, काँग्रेस पक्षाने डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे नाराज असलेल्या सेवक वाघाये यांनी बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. याबाबत त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता, त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत.मी लोकसभा लढावी, अशी जनतेची मागणी असल्याने उमेदवारी दाखल केली आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेने उमेदवार असलेल्या डॉ. पडोळे यांना केवळ दोन हजार मते मिळाली होती आणि अशा उमेदवाराला काँग्रेसने लोकसभेची उमेदवारी दिली आहे. काँग्रेसचा उमेदवार ज्याने कधीही काँग्रेसचा पंजा हातात घेतला नाही.

### गोंदियाच्या माणसाला गडचिरोलीची उमेदवारी

» बॅनर-पोस्टर हातात घेतले नाहीत, अशाला तिकीट देण्यात आले. भंडारा आणि गडचिरोली लोकसभेची तिकीट विकल्याचा आरोप होत आहे. काँग्रेसमधील नेते पक्ष सोडून जात आहेत. गोंदियाच्या माणसाला गडचिरोलीची उमेदवारी दिली. पैसे देऊन उमेदवारी देणे हा चुकीचा प्रकार असल्याचे सेवक वाघाये म्हणाले.भाजपच्या उमेदवाराला जिंकवण्यासाठी भंडाऱ्यात काँग्रेसचा 'डमी' उमेदवार देण्यात आला.

# अरविंद केजरीवाल यांना दिलासा!

## केजरीवाल यांची ईडी कोठडी 1 एप्रिलपर्यंत वाढविली

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सहा दिवसांपूर्वी अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवण्यासाठीची याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. जी फेटाळण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना एक प्रकारे हा दिलासाच दिला आहे. मद्य धोरण घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे.**



अरविंद केजरीवाल यांना ईडीने नऊवेळा समन्स बजावलं होतं. त्यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं होतं. त्यानंतर २१ मार्च रोजी त्यांना अटक करण्यात आली. दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कारवाईपासून दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर लगेचच ईडीचं पथक चौकशीसाठी हजर झालं. यानंतर 'आप'चे नेते सौरभ भारद्वाज यांनी ईडीच्या पथकाला घरात येण्यापासून रोखलं. मात्र दिल्ली पोलिसांनी घराचा ताबा घेतला. तिथे कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला. दरम्यान 'आप'च्या काही नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली होती. मात्र त्याच दिवशी अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरुन हटवण्यासाठी जी याचिका दाखल करण्यात आली होती ती दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. अनेक दिवसांपासून ईडीकडून अरविंद केजरीवाल यांची चौकशी सुरू होती. तसंच, त्यांना चौकशीकरता ईडी कार्यालयात बोलावण्यात आले होते. तब्बल ९ वेळा समन्स बजावण्यात आले होते. परंतु, प्रत्येकवेळी अरविंद केजरीवाल यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं. त्यांना अटक होणार याची खात्री होती. त्यामुळे अटकपूर्व जामीनासाठी त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, अटकेतून दिलासा देण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला, ज्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.दिल्ली न्यायालयाने गुरुवारी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणाशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ०१ एप्रिलपर्यंत अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कोठडी सुनावली. त्यांना २१ मार्चच्या रात्री अटक करण्यात आली होती. सहा दिवसांच्या ईडी कोठडीची मुदत संपल्यानंतर केजरीवाल यांना न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर राऊस अव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष सीबीआय न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी हा आदेश दिला. काल दिल्ली उच्च न्यायालयाने केजरीवाल यांना कोणताही अंतरिम दिलासा नाकारला होता आणि अटक आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या त्यांच्या याचिकेवर नोटीस बजावली होती. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांनी न्यायालयाला सांगितले की, विद्यमान मुख्यमंत्री चौकशीदरम्यान चुकीची उत्तरे देत आहेत आणि एजन्सीला गोव्यातून बोलावलेल्या काही व्यक्तींशी त्यांचा सामना करणे आवश्यक आहे. त्यामुळे ईडीने आणखी सात दिवसांची कोठडी मागितली. मुख्यमंत्री असेल तर त्याची निर्दोष मुक्तता होत नाही. मुख्यमंत्र्यांसाठी वेगळे मानक नाहीत. मुख्यमंत्र्यांना अटक करण्याचा अधिकार सामान्य माणसापेक्षा वेगळा नाही. रिमांडची मागणी करताना ईडीने सांगितले की, मोबाईल फोनमधून डेटा काढण्यात आला असून त्याचे विश्लेषण केले जात आहे. मात्र, २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांच्या परिसरात झडतीदरम्यान जप्त करण्यात आलेल्या अन्य चार डिजिटल उपकरणांचा डेटा अद्याप काढण्यात आलेला नाही.

### अटकेतून दिलासा देण्यास नकार

अरविंद केजरीवाल यांना ईडीने नऊवेळा समन्स बजावलं होतं. त्यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं होतं. त्यानंतर २१ मार्च रोजी त्यांना अटक करण्यात आली.दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कारवाईपासून दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर लगेचच ईडीचं पथक चौकशीसाठी हजर झालं. यानंतर 'आप'चे नेते सौरभ भारद्वाज यांनी ईडीच्या पथकाला घरात येण्यापासून रोखलं. मात्र दिल्ली पोलिसांनी घराचा ताबा घेतला. तिथे कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला. दरम्यान 'आप'च्या काही नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली होती. मात्र त्याच दिवशी अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावरुन हटवण्यासाठी जी याचिका दाखल करण्यात आली होती ती दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. अनेक दिवसांपासून ईडीकडून अरविंद केजरीवाल यांची चौकशी सुरू होती. तसंच, त्यांना चौकशीकरता ईडी कार्यालयात बोलावण्यात आले होते. तब्बल ९ वेळा समन्स बजावण्यात आले होते. परंतु, प्रत्येकवेळी अरविंद केजरीवाल यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं. त्यांना अटक होणार याची खात्री होती.  अटकेतून दिलासा देण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला, ज्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

# सरन्यायाधीशांना लिहिलेल्या पत्रावर मोदींची प्रतिक्रिया

## पत्रानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर शरसंधान साधले

।नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काही विशिष्ट गटाच्या लोकांकडून न्यायसंस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पत्र देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाचे चंद्रचूड यांना लिहिले. हे पत्र लिहिल्यानंतर काही तासांतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर भाष्य केलं आहे. या पत्राच्या निमित्ताने पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे. इतरांना घाबरवणं-धमकावणं ही काँग्रेसची जुनी सवय आहे, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लॉ बिट या एक्स हँडलवरील एक पोस्ट शेअर केली आहे आणि त्यावर आपलं मत नोंदवलं. ते म्हणाले, "काँग्रेसने घाबरवण्याची आणि धमकावण्याची संस्कृती जोपासली. पाच दशकापूर्वी ते न्यायपालिकेच्या कटिबद्धतेबद्दल बोलत होते. त्यांना निलाजरेपणाने स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांची कटिबद्धता हवी असते. राष्ट्राप्रती मात्र त्यांना काहीच देणंघेणं नसतं. १४० कोटी भारतीयांनी त्यांना नाकारलं तर आश्चर्य वाटणार नाही."काही विशिष्ट लोकांचा समूह न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा, न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा आणि विचित्र तर्क आणि राजकीय अजेंड्याच्या आधारावर न्यायालयांची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप करून देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालायचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्यासमोर पत्राद्वारे चिंता व्यक्त केली आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवे आणि इतर ६०० वकिलांनी असा आरोप केल्यामुळे देशभरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष करून लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मागच्या काही काळात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिले आहेत. यातील अनेक निकाल हे राजकारणाशी निगडित होते. वकिलांनी या पत्रात म्हटले की, राजकीय नेते आणि भ्रष्टाचाराची प्रकरणांमध्ये गुंतलेल्या लोकांकडून न्यायालयावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. "हेतुपुरस्सर न्यायव्यवस्थेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न एका गटाकडून केला जात आहे. त्यामुळे न्यायाव्यवस्थेच्या कार्याचे वैशिष्ट असलेले विश्वास आणि सौहार्दाचे वातावरण बिघडत आहे. राजकीय आणि भ्रष्टाचाराच्या प्रकणांमध्ये गुंतलेल्या लोकांकडून न्यायव्यवस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे न्यायालयाला धमकावले जात आहे. तसेच लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण होत आहे", अशी चिंता या पत्रातून व्यक्त करण्यात आली.

### 140 कोटी भारतीयांनी त्यांना नाकारलं

"काँग्रेसने घाबरवण्याची आणि धमकावण्याची संस्कृती जोपासली. पाच दशकापूर्वी ते न्यायपालिकेच्या कटिबद्धतेबद्दल बोलत होते. राष्ट्राप्रती मात्र त्यांना काहीच देणंघेणं नसतं. १४० कोटी भारतीयांनी त्यांना नाकारलं तर आश्चर्य वाटणार नाही."काही विशिष्ट लोकांचा समूह न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा, न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा आणि विचित्र तर्क आणि राजकीय अजेंड्याच्या आधारावर न्यायालयांची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप करून देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालायचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्यासमोर पत्राद्वारे चिंता व्यक्त केली आहे.

# अदिती राव हैदरीच्या पहिल्या नवऱ्याची दुसरी बायको

अभिनेत्री अदिती राव हैदरीने दुसरं लग्न केल्याची चर्चा सुरू असतानाचं अदितीने मौन सोडत या अफवेला पूर्णविराम दिला. अदिती व सिद्धार्थ यांनी लग्न नाही, तर साखरपुडा केला आहे. अभिनेत्रीने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर तिचा आणि दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थबरोबरचा फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी दिली. अदिती व सिद्धार्थ यांनी २७ मार्च रोजी तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम इथं साखरपुडा केला. 'तो हो म्हणाला' असं कॅप्शन देत अदितीने साखरपुड्याची गुडन्यूज दिली. दोघांनी लग्न केल्याचं वृत्त तेलुगू माध्यमांनी दिलं होतं. पण अदिती व सिद्धार्थ यांनी साखरपुडा केला आहे हे आता अदितीनंच स्पष्ट केलंय. अदिती लवकरच दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकणार आहे. यानिमित्ताने अदितीचा पहिला पतीबद्दल जाणून घेऊया.आदितीचं सत्यदीप मिश्राबरोबर लग्न झाल्याची बातमी समोर आली होती. तथापि, तिने कधीही तिच्या वैवाहिक स्थितीबद्दल भाष्य केलं नाही. २०१३ मध्ये तिने खुलासा केला होता की ते दोघं वेगळे झाले आहेत. सत्यदीपने नंतर ज्येष्ठ अभिनेत्री नीना गुप्ता यांची मुलगी मसाबा गुप्ताबरोबर लग्न केलं. मसाबा गुप्ता एक सेलिब्रिटी फॅशन डिझायनर आहे. २०२३ रोजी मसाबा आणि सत्यदीप यांनी लग्नगाठ बांधली. मसाबाचं पहिलं लग्न निर्मति मधु मंतेना यांच्याशी झालं होतं. २०१५ मध्ये त्यांचं लग्न झालं आणि २०१९ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला.अदितीचा होणारा पती सिद्धार्थ याचंही हे दुसरं लग्न आसणार आहे. २००३ मध्ये सिद्धार्थच्या बालपणीची प्रेयसी मेघनाबरोबर त्याने लग्न केलं होतं. मात्र, २००७ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला.दरम्यान, अदिती राव हैदरी आणि सिद्धार्थच्या लव्हस्टोरीबद्दल सांगायचं झालं तर, २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'महासमुद्रम' चित्रपटात दोघांनी एकत्रित काम केलं होतं. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अदिती राव हैदरी आणि सिद्धार्थ एकमेकांच्या प्रेमात पडले. अनेकदा ते कार्यक्रमांना एकत्र हजेरी लावताना दिसले. चंदिगडमध्ये पार पडलेल्या बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव आणि पत्रलेखा यांच्या लग्नालाही त्यांनी एकत्र हजेरी लावली होती.अभिनेत्री अदिती राव हैदरीने दुसरं लग्न केल्याची चर्चा सुरू असतानाचं अदितीने मौन सोडत या अफवेला पूर्णविराम दिला. अदिती व सिद्धार्थ यांनी लग्न नाही, तर साखरपुडा केला आहे. अभिनेत्रीने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर तिचा आणि दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थबरोबरचा फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी दिली.

## सोनाक्षीचा अप्रतिम लुक

बाजीराव मस्तानी आणि पद्मावत यांसारख्या प्रोजेक्टनंतर आता संजय लीला भन्साळी चाहत्यांसाठी हीरामंडी घेऊन येत आहेत.या मालिकेत अनेक अभिनेत्री दिसणार आहेत. या मालिकेत कथेपासून ते स्टारकास्टपर्यंत सर्व काही पाहण्यासारखे असणार आहे.आज हिरमंडीचा एक कार्यक्रम झाला, ज्यामध्ये संपूर्ण स्टारकास्टने खास स्टाइल दाखवलीआउटफिटपासून मेकअपपर्यंत अभिनेत्रीचा संपूर्ण लुक खूपच आकर्षक दिसत होता.सोनाक्षी सिन्हा नेहमीच अनोख्या लूकमध्ये पाहायला मिळते.आज हिरामंडीच्या कार्यक्रमात ती केशरी रंगाच्या आउटफिटमध्ये दिसली.तिने पलाझोसोबत डिझाईनचा कोट कॅरी केला आहे. नेकपीस घातला नसताना, अभिनेत्रीने कानात फक्त मॅचिंग झुमके घातले आहेत. सोनाक्षीचा संपूर्ण लुक अप्रतिम दिसत आहे. बाजीराव मस्तानी आणि पद्मावत यांसारख्या प्रोजेक्टनंतर आता संजय लीला भन्साळी चाहत्यांसाठी हीरामंडी घेऊन येत आहेत.या मालिकेत अनेक अभिनेत्री दिसणार आहेत. या मालिकेत कथेपासून ते स्टारकास्टपर्यंत सर्व काही पाहण्यासारखे असणार आहे.



## करिश्मा आणि करीना शिवसेनेत?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज दिग्गजांचे प्रवेश शिवसेनेत होणार आहेत. अभिनेत्री करीना कपूर, करीश्मा कपूर या दोन्ही अभिनेत्री शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, हाती भगवा झेंडा घेणार आहेत अशी माहिती सूत्रांकडून मिळते आहे. मुंबई काँग्रेसचा एक बडा नेता शिवसेनेत प्रवेश करणार अशीही माहिती मिळते आहे. हे नेते दुसरे तिसरे कुणीही नसून संजय निरुपम आहेत अशीही चर्चा आहे. संजय निरुपम यांनी बुधवारीच उद्धव ठाकरेंवर टीका करत नाराजी व्यक्त केली होती. अभिनेता गोविंदाने काही वेळापूर्वीच भगवा झेंडा हाती घेत एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आता त्यापाठोपाठ करिश्मा कपूर आणि करीना कपूर या दोघीही शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. अभिनेत्री करिश्मा कपूर आणि अभिनेत्री करीना कपूर वर्षा बंगल्यावर गेल्या आहेत. या दोन्हीही अभिनेत्रींचा राजकारणात प्रवेश होणार असल्याच्या चर्चा यामुळेच रंगल्या आहेत. कपूर कुटुंबीयांकडून याबाबत भाष्य करण्यात आलेलं नाही. आत्तापर्यंत कपूर घराण्यात कुणीही राजकारणात प्रवेश केलेला नाही. अशात जर या दोघींनी शिवसेनेत प्रवेश केला तर ही मोठी घडामोड असणार आहे. लोकसभा निवडणूक आली की अभिनेते, अभिनेत्री विविध पक्षांमध्ये प्रवेश करतात. २००४ मध्ये गोविंदाने काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता आणि भाजपाच्या राम नाईक यांना हरवलं होतं. आता करीना आणि करीश्मा शिवसेनेत येणार का? आल्या तर त्यांना लोकसभेची जबाबदारी दिली जाणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज दिग्गजांचे प्रवेश शिवसेनेत होणार आहेत. अभिनेत्री करीना कपूर, करीश्मा कपूर या दोन्ही अभिनेत्री शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

## नवाजुद्दीन सिद्दीकी व पत्नीतील वाद मिटले

अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी व त्याची पत्नी आलिया यांच्यातील वाद गेल्या वर्षी खूप चर्चेत होते. दोघांनी एकमेकांवर खूप गंभीर आरोप केले होते. पतीने आपल्याला मुलांसह मध्यरात्री घरातून बाहेर काढल्याचं आलियाने एका व्हिडीओमध्ये म्हटलं होतं. अशातच आता आलियाने केलेल्या एक पोस्टने लक्ष वेधून घेतलं आहे. तिने फॅमिली फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यात त्यांच्या लग्नाच्या १४ व्या वाढदिवसाचा उल्लेख केला आहे. आलिया सिद्दीकीने सांगितलं की नवाजुद्दीन तिला व मुलांना भेटायला दुबईला आला होता. "माझ्या आयुष्यात अलीकडच्या काळात काही गोष्टी बदलल्या आहेत. मला वाटलं की आपण वाईट गोष्टी जगाबरोबर शेअर करतो तर चांगल्या गोष्टीही केल्या पाहिजेत. नवाज इथे होता, त्यामुळे आम्ही मुलांबरोबर लग्नाचा वाढदिवस साजरा केला. इतकंच नाही तर नवाजुद्दीन डिसेंबर २०२३ मध्ये दुबईमध्ये होता. आम्ही सर्वांनी एकत्र नवीन वर्षाचं स्वागत केलं होतं," असं आलियाने म्हटलंय. तिने फॅमिली फोटो शेअर करून लग्नाचा १४ वा वाढदिवस आपल्या जवळच्या लोकांबरोबर शेअर करत असल्याचं लिहिलं आहे.आलिया पुढे म्हणाली, "आमच्या नात्यात आम्हाला ज्या समस्यांना सामोरं जावं लागलं त्या नेहमीच तिसऱ्या व्यक्तीमुळे होत्या असं मला वाटतं. पण आता सगळे गैरसमज दूर झाले आहेत. आमच्या मुलांसाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आता आयुष्यात वेगळे राहण्याचा पर्याय नाही, कारण मुलंही मोठी होत आहेत.



## परिणीती चोप्रा गरोदर असल्याच्या चर्चांना उधाण

अभिनेत्री परिणीती चोप्राने अभिनय क्षेत्रासह तिच्या संगीत क्षेत्रातही पदार्पण केलं. अभिनय क्षेत्रातून संगीत क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या परिणीतीचा पहिला लाइव्ह परफॉर्मन्स मुंबईत पार पडला होता. रविवारी, २८ जानेवारी रोजी मुंबई फेस्टिवल २०२४ मध्ये सहभाग घेत तिने आपला पहिला लाईव्ह परफॉर्मन्स सादर केला होता.आता परिणीतीचा 'अमर सिंग चमकिला' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाच्या ट्रेलर लॉंच सोहळ्यात परिणीती आणि दिलजीत दोसांझ यांनी हजेरी लावली होती.'अमर सिंग चमकिला' चित्रपटाच्या लॉंच सोहळ्यात परिणीतीने काळ्या रंगाचा कफ्तान ड्रेस परिधान केला होता. यापूर्वी परिणीती गरोदर असल्याच्या चर्चा अनेकदा समोर आल्या आहेत आणि आता पुन्हा एकदा या चर्चांना उधाण आलं आहे आणि त्याचं कारण ठरलं परिणीतीचा काळा कफ्तान ड्रेस.अभिनेत्रीने या सोहळ्यात परिधान केलेल्या या काळ्या ड्रेसवरून सगळेच तर्क वितर्क लावू लागले आणि परिणीती प्रेग्नंट आहे का अशा चर्चा रंगल्या. ट्रेलर लॉंच सोहळ्यातील परिणीतीचे फोटोज आणि व्हिडीओज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. या व्हायरल झालेल्या फोटोंचे परिणीतीने मजेशीर उत्तर देत या चर्चांना पूर्णविराम दिला.

# राजस्थानचा सलग दुसरा विजय!

## रोमहर्षक सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा 12 धावांनी पराभव

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील नववा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने होते. या रोमांचक सामन्यात राजस्थानने शेवटच्या षटकात दिल्लीचा १२ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील सलग दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना रियान परागच्या नाबाद ८४ धावांच्या जोरावर राजस्थानने ५ बाद १८५ धावा केल्या होत्या. मात्र, प्रत्युत्तरात दिल्लीला ५ बाद १७३ धावांपर्यंतच मजल मारता आली.**





प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने १८५ धावांची मोठी मजल मारली होती. रियान परागने ४५ चेंडूत नाबाद ८४ धावा करत राजस्थानला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या संघाने लवकर २ गडी गमावले असले, तरी ऋषभ पंत आणि डेव्हिड वॉर्नरच्या ६७ धावांच्या भागीदारीने संघाचे पुनरागमन केले. शेवटच्या ५ षटकात दिल्लीला विजयासाठी ६६ धावांची गरज होती.मात्र संघाचे फलंदाज सातत्याने बाद होत राहिले. त्यामुळे दिल्लीचा हा सामना १२ धावांनी हरला आहे. दिल्लीकडून फलंदाजी करताना डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. याशिवाय स्टब्सने २३चेंडूत ४३धावांची नाबाद खेळी खेळली पण तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. राजस्थान संघाकडून बर्गर आणि चहलने प्रत्येकी २ आणि आवेश खानने एक विकेट घेतली. आवेश खानने शेवटच्या षटकात राजस्थानसाठी अप्रतिम गोलंदाजी केली.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्स संघाची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसनचा संघ फलंदाजी करताना संघर्ष करताना दिसला. अवघ्या नऊ धावांच्या स्कोअरवर संघाला पहिला धक्का बसला. यशस्वी जैस्वाल केवळ पाच धावा करू शकला आणि पॅव्हेलियनमध्ये परतला. दिल्लीविरुद्ध राजस्थानने २६ धावांवर तीन विकेट गमावल्या. संघाला दुसरा धक्का जोस बटलरच्या रूपाने बसला तो केवळ ११ धावा करू शकला, तर संजू सॅमसन १५ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर रविचंद्रन अश्विन पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने रियान परागसोबत चौथ्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी केली. अश्विनने या सामन्यात १९ चेंडूंचा सामना करत २९ धावा केल्या. यानंतर ध्रुव जुरेलनेही २० धावांची जलद खेळी केली. त्याने १२ चेंडूंचा सामना करत तीन चौकार मारले. त्याने रियान परागसोबत ४३ धावांची नाबाद भागीदारी केली. या सामन्यात हेटमायर १४ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. त्याचवेळी रियान परागच्या झंझावाती खेळीमुळे राजस्थानची धावसंख्या १८० च्या पुढे गेली.रियान परागने ४५ चेंडूंचा सामना करत सात चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने नाबाद ८४ धावा केल्या. आतापर्यंतच्या आयपीएलमधील रियान परागची सर्वोच्च खेळी आहे. त्याने शेवटच्या षटकात त्याने एनरिच नॉर्खियाला लक्ष्य केले आणि २५ धावा केल्या. या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. दिल्लीकडून खलील अहमद, मुकेश कुमार, एनरिच नॉर्खिया, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक विकेट घेतलीरियान परागने ४५ चेंडूत नाबाद ८४ धावा करत राजस्थानला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या संघाने लवकर २ गडी गमावले असले, तरी ऋषभ पंत आणि डेव्हिड वॉर्नरच्या ६७ धावांच्या भागीदारीने संघाचे पुनरागमन केले.

### वॉर्नरने 49 धावांची खेळी केली

रियान परागने ४५ चेंडूत नाबाद ८४ धावा करत राजस्थानला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या संघाने लवकर २ गडी गमावले असले, तरी ऋषभ पंत आणि डेव्हिड वॉर्नरच्या ६७ धावांच्या भागीदारीने संघाचे पुनरागमन केले. शेवटच्या ५ षटकात दिल्लीला विजयासाठी ६६ धावांची गरज होती.मात्र संघाचे फलंदाज सातत्याने बाद होत राहिले. त्यामुळे दिल्लीचा हा सामना १२ धावांनी हरला आहे. दिल्लीकडून फलंदाजी करताना डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. याशिवाय स्टब्सने २३चेंडूत ४३धावांची नाबाद खेळी खेळली पण तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. राजस्थान संघाकडून बर्गर आणि चहलने प्रत्येकी २ आणि आवेश खानने एक विकेट घेतली.

# पराभूत झाल्यानंतर हार्दिक पंड्याने दिली प्रतिक्रिया

## पंड्याने सांगितले मुंबईच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ मधील आठवा सामना राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम हैदराबाद येथे पार पडला. या सामन्यात हैदराबादने विक्रमी धावसंख्या उभारत मुंबईचा ३१ धावांनी धुव्वा उडवला. मुंबईचा हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील सलग दुसरा पराभव ठरला. सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना ३ गड्यांच्या मोबदल्यात २७७ धावा केल्या होत्या. मात्र प्रत्युत्तरात मुंबईला २४६ धावाच करता आल्या. या पराभवानंतर कर्णधार हार्दिक पंड्याने पराभवाचे कारण सांगितले.**



या सामन्यात एकूण ५२३ धावा झाल्या, हा आयपीएलचा विक्रम आहे. एवढेच नाही तर या सामन्यात ३८ षटकार मारले गेले, जो टी-२० क्रिकेटमधील एक नवा विक्रम आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धचा सामना गमावल्यानंतर मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्याने मोठे वक्तव्य केले आहे. मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२४ मध्ये हार्दिक पंड्याला आपला कर्णधार बनवले आणि आतापर्यंत त्याच्या नेतृत्वाखाली संघाची कामगिरी खूपच खराब झाली आहे.पहिल्या सामन्यात मुंबईला गुजरात टायटन्सकडून पराभव पत्करावा लागला होता. आता दुसऱ्या सामन्यात मुंबईचा हैदराबादविरुद्धही पराभव झाला. ज्यामुळे मुंबई इंडियन्स संघ गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. या पराभवावर बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, “वास्तविक सनरायझर्स हैदराबाद संघ २७७ धावा करेल, असे आम्हाला वाटले नव्हते. खेळपट्टी चांगली होती. तुम्ही कितीही वाईट किंवा चांगली गोलंदाजी केली तरीही विरोधी संघाने एवढी मोठी धावसंख्या उभारली म्हणजे त्यांनी चांगली फलंदाजी केली. गोलंदाजांसाठी ही खेळपट्टी चांगली नव्हती. खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल होती, ज्यामुळे जवळपास ५०० धावांचा पाऊस पडला.”

### मफाकाने 4 षटकात 66 धावा दिल्या

आपल्या संघाचा बचाव करताना हार्दिक पंड्या म्हणाला, “आमच्याकडे तरुण गोलंदाजी आक्रमण आहे आणि आम्ही शिकू. चेंडू वारंवार प्रेक्षकांमध्ये जात असल्याने षटक पूर्ण करण्यासाठी वेळ लागतो. सर्व फलंदाजांना चांगली कामगिरी केली.” मुंबईने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७ वर्षीय युवा वेगवान गोलंदाज क्वेना मफाकाला पदार्पण करण्याची संधी दिली. या सामन्यात क्वेना मफाकाने ४ षटकात ६६ धावा दिल्या. यावरही हार्दिक पंड्याने प्रतिक्रिया दिली.हार्दिक पंड्या म्हणाला, “युवा क्वेना मफाका चांगला वेगवान गोलंदाज आहे. पण त्याला अजून काही सामने खेळण्याची गरज आहे.” या सामन्यात क्वेना मफाकाला एकही विकेट मिळाली नाही.